**ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ**
ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು–560003.

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD**
Malleshwaram, Bengaluru – 560003.

**2020-21 ಸಾಲಿನ ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆ ಪತ್ರಿಕೆ - 1**
**2020-21 MODEL QUESTION PAPER - 1**

| | |
|---|---|
| **ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ** | **ವಿಷಯ ಸಂಕೇತ : 08-M** |
| **Subject : FIRST LANGUAGE MARATI** | **Subject Code : 08-M** |
| **ಅವಧಿ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷ** | **ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100** |
| **Time : 3 hrs. 15 minutes** | **Max. Marks : 100** |

**ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿಗಳಿಗೆ**
**Regular Fresh**

---

## विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1) प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ प्रकारचे 45 प्रश्न आहेत.

2) प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील (बंद) करण्यात आली आहे. परीक्षा सुरु झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3) बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांने पालन करा.

4) उजव्या बाजूच्या कडेला (काठावर) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5) पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा. 6 x 1 = 6**

1. "अनन्या" या संधीयुक्त शब्दाचा विग्रह असा होतो –

   A. अन् +अन्या

   B. अनु + अन्या

   C. अना + अन्या

   D. अनी + अन्या

2. "आदिती अभ्यास करते" या वाक्याचा काळ हा आहे –

   A. भूतकाळ

   B. भविष्यकाळ

   C. वर्तमानकाळ

   D. यापैकी नाही

3. "आग सोमेश्र्वरी, बंब .........." म्हण पूर्ण करा –

   A. योगेश्र्वरी

   B. रामेश्र्वरी

   C. महानगरी

   D. माघारी

4. 'ज्यास कोणीही शत्रू नाही' असा या शब्दसमूहासाठी योग्य शब्द हा आहे –

   A. शत्रू

   B. नाशत्रू

   C. दुष्मन

   D. अजातशत्रू

5. 'मी निबंध लिहितो' या वाक्यातील 'लिहितो' या शब्दाची जात ही आहे –

   A. विशेषण

   B. क्रियापद

   C. नाम

   D. सर्वनाम

6. "आई" या शब्दाचा खालीलपैकी समानार्थी शब्द ओळखा –

   A. जननी

   B. पत्नी

   C. भार्या

   D. भगिनी

**II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा.** **4 x 1 = 4**

7. चा,ची,चे : षष्ठी विभक्ती :: ने,ए,शी : ...................

8. आराध्या गाणे गाते : कर्तरी प्रयोग :: त्याने चोरास पकडले : ..................

9. महादेव : कर्मधारय समास :: अष्टदिशा : ...................

10. न्याय : अन्याय :: सत्य : ...................

**III. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **7 x 1 = 7**

11. डॉ. आंबेडकरांनी विद्या कशी संपादन केली ?

12. सावित्रीबाई फुले यांचा जन्म कोणत्या गावी झाला ?

13. 1924 च्या बेळगावी काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते ?

14. कवी कावळयाला कशाचा घास (उंडी) भरविणार आहेत ?

15. रुक्मिणीचे लग्न कोणाशी ठरविलेले होते ?

16. पहिल्या हिरण्या तृणपात्याच्या सत्कारावेळी स्वागतगीत कोणी म्हटले?

17. गुराख्याचे पाय कशामुळे निब्बर होतात?

**IV. खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा.** **3 x 2 = 6**

18. खालील वाक्‌प्रचाराचा अर्थ सांगूण वाक्यात उपयोग करा.

    अ. झुंजूमुंजू होणे

    ब. पांग फेडणे

19. खालील ओळीतील अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

    'दंड कमंडलू बंड माजविशी मुंडमुंडशी तपा'

20. खालील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.

    'घालील धाड शिशुपाल कळे न केव्हा'

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.** **7 x 2 = 14**

21. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा थोडक्यात परिचय लिहा?

22. लेखक पाकगृहाच्या दारात उभे राहिल्यावर त्यांना कोणते दृश्य दिसले?

23. जपानी स्त्रिया कोणकोणती कामे करतात?

24. "तुला टाळ भिजत घालून त्याचं पाणी पाजलं म्हणजे ताल समजेल" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

25. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने कोणते प्रयत्न केले?

26. शाहीर रामजोशी यांचा थोडक्यात परिचय लिहा.

27. "विठ्ठला विठ्ठला। भाकरी गा होई" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1 x 3 = 3**

28. अ. "आधी पोटोबा, मग विठोबा"

    ब. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा. 10 x 3 = 30**

29. आंधळयांनी हत्तीचे वर्णन कसे केले आहे?

30. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले?

31. 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

32. पर्यावरण या विषयाचे महत्व डॉ. रविंद्र कोल्हे आदिवासी मुलांना कसे पटवून देत असत?

33. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या?

34. हवा असलेला शकुन सांगण्यासाठी कवी कावळयाला कोण-कोणत्या गोष्टी देऊ करतो?

35. ''भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा'' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

36. पहिल्या हिरव्या तृणपात्याचा सत्कार कशाप्रकारे करण्यात आला. ते 'सत्कार' कवितेच्या आधारे लिहा.

37. 'नेनंता गुराखी' या कवितेतील गुराख्याचे वर्णन करा.

38. 'धरण' कवितेचा थोडक्यात सारांश लिहा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा. 4 x 4 = 16**

39. शेवटी गणातात्यांनी 'आम्ही नवरा-बायको एकत्रीतच राहणार' असा निर्धार का व्यक्त केला? सविस्तर लिहा.

किंवा

गणातात्यांना आपल्या धाकटया मुलाचा राग का येत होता? ते स्पष्ट करा.

40. दुसऱ्या प्रसंगातून लेखकाने आपल्या आईला कसे समजून घेतले?

किंवा

लेखक कोणते दिवास्वप्न पहात असत? सविस्तर लिहा.

41. 'पाहुणे' या कवितेच्या आधारे पाहुण्यांच्या स्वभाव दोषांचे वर्णन करा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

या भारतात बंधुभाव ..........................................

.....................................................................

.....................................................................

................................................वा हो इस्लामी।

किंवा

जातिभाव विसरूनिया..........................................

.....................................................................

.....................................................................

..................................................... भीती बावरी।

**IX. पुढे दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 2 x 2 = 4**

43. भारत हा खेडयांचा देश आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्ष झाली तरी अजून खेडयापाडयामध्ये चांगले रस्ते नाहीत. शिक्षणाची उत्तम सोय नाही, अद्ययावत वैद्यकीय सेवा उपलब्ध नाहीत, तरुणांना रोजगार नाही; त्यामुळे खेडयातील तरुण शहरांकडे धाव घेत आहेत. उद्योगधंदयांची वाढ शहरातच झाल्याने स्वाभाविक लोकांची शहरांकडे धाव आहे. त्यामुळे शहरात प्रचंड गर्दी वाढत आहे. अमर्याद लोकसंख्येमुळे शहरामध्ये पर्यावरण प्रदूषण, कचऱ्याची समस्या, अस्वच्छता, राहाण्याच्या जागेचा अभाव अश्या समस्या भेडसावत आहेत. उत्तम शिक्षण, उत्तम आरोग्यसेवा, रोजगार, कारखाने, रस्ते, वीजपुरवठा, पुरेसे पाणी या गोष्टी खेडयात उपलब्ध असतील तर छोट्या गावचे नकळत शहरीकरण होईल. त्यासाठी गावे स्वावलंबाने उभी करण्यासाठी लोकानी प्रेरणा घ्यायला हवी. पाण्याचे नियोजन करणे. सहकाराचा वापर करुन खेडयातील लोकांना व्यापार, उद्योगात सहभागी करुण घेणे, शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान गावातील तरुणानां उपलब्ध करूण देणे, यांसारख्या गोष्टीनी गावे स्वयंपूर्ण तर होतीलच व शहरातील समस्याही कमी होतील.

**प्रश्न :**

अ. खेडयातील तरुण शहराकडे का धाव घेत आहेत ?

ब. गावे केव्हा स्वयंपूर्ण होतील ?

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.** 1 x 5 = 5

44. दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही पुढे काय करणार आहात ते तुमच्या मित्राला / मैत्रिणीला पत्राद्वारे कळवा.

किंवा

तुमच्या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी ग्रामपंचायत अध्यक्षांना / नगराध्यक्षांना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याबद्दल निमंत्रण पत्र लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा.** 1 x 5 = 5

45. a. आरोग्य हीच खरी संपत्ती

किंवा

b. वाढती लोकसंख्या : एक समस्या